आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि

दिनांक:17.11.2024 वार:रविवार

---

ठळक बातम्या

1) पंतप्रधान नायजेरिया, ब्राझिल आणि गयानाच्या 5 दिवसांच्या दौऱ्यावर
2) महायुतीच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रात केलेल्या कामाची पंतप्रधानांकडून प्रशंसा
3) विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात
4) माझी लाडकी बहीण योजना, आरक्षण धोरण, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी यावर प्रचाराचा भर
5) डॉक्टर मीरा बोरवणकर यांना यंदाचा अनंत भालेराव स्मृती पुरस्कार जाहीर

पंतप्रधान संबोधन
पंतप्रधान नरेंद्र मोदी नायजेरिया, ब्राझिल आणि गयानाच्या 5 दिवसांच्या दौऱ्यावर सर्वप्रथम नायजेरियाची राजधानी अबुजा इथं काल पोहोचले. नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद तिनुबु यांच्या आमंत्रणावरुन सतरा वर्षांमध्ये एखाद्या भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच नायजेरिया दौरा आहे. ब्राझीलमध्ये रिया दे जानेरो इथं उद्या 18 तारखेला जी-20 शिखर बैठकीत मोदी उपस्थित राहतील. गयाना देशाला मोदी यांची भेट 1968 नंतर एखाद्या भारतीय पंतप्रधानांची पहिलीच भेट असेल. या दौऱ्यामुळं या देशांसोबत लोकशाही आणि वचनबद्धतेवर आधारित सामरीक भागीदारीचं नवं द्वार उघडेल असा विश्वास त्यांनी दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी व्यक्त केला. या देशांसोबत विविध क्षेत्रातील अनेक करार देखील अपेक्षित आहेत.

मोदी-कार्यकर्ता
समाजातील प्रत्येक वर्गाच्या सशक्तीकरणाकडं लक्ष केंद्रित केल्याबद्दल महायुती सरकारच्या प्रयत्नांची भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली. त्यांनी काल मेरा बूथ सबसे मजबूत या कार्यक्रमांतर्गत भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांशी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधला. ते म्हणाले की महायुती सरकारच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळातील कामांवर महाराष्ट्राची जनता समाधानी आहे. न थकता कित्येक महिन्यांपासून महायुतीचे कार्यकर्ते करत असलेल्या कामाची त्यांनी प्रशंसा केली.

प्रचार-आढावा
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, आरक्षण धोरण, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी या भोवती प्रचार फिरत आहे. सोयाबीनसाठी 7,000 ची किमान आधारभूत किंमत देण्याच्या आणि कांद्याला रास्त भाव ठरवण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्याच्या महाविकास आघाडीच्या वचनबद्धतेचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल पुनरुच्चार केला. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे इथं एका निवडणूक सभेला संबोधित करताना त्यांनी भारताच्या विकासात काँग्रेस पक्षाचे महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित केले. काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी शिर्डी इथल्या सभेत बोलताना केंद्र सरकार गेली दहा वर्षे काम करत आहे मग आता त्यांना आपल्या लाडक्या बहिणींचा विचार का आला? असा प्रश्न उपस्थित केला.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दापोली इथल्या सभेत बोलताना आगामी निवडणुकीत राज्यात सत्ताधारी महायुती आघाडीला 170 जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त केला. शिंदे म्हणाले की, कोकणातील जनता बाळासाहेब ठाकरे यांची विचारधारा घेऊन पुढे जाणाऱ्या पक्षाशी एकनिष्ठ आहे.

येत्या पाच वर्षांत मुंबईकरांच्या प्रवासात लक्षणीय सुधारणा होईल, अशी ग्वाही केंद्रीय रेल्वे मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अश्विनी वैष्णव यांनी काल मुंबईत एका पत्रकार परिषदेत दिली. रेल्वेमध्ये 1 लाख 64 हजार कोटींहून अधिक आणि राज्यातील मेट्रो प्रकल्पांमध्ये 1 लाख 10 हजार कोटींहून अधिक गुंतवणूक केली जात असल्याचं त्यांनी नमूद केलं.

राजनाथ

भाजपच्या वसई विधानसभा मतदासंघाच्या उमेदवार स्नेहा दुबे यांच्या प्रचारासाठी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी काल वसईत जाहीर सभेत बोलताना या देशात लाखो जाती, पोटजाती आणि गोत्र आहेत, तर मग काँग्रेस प्रत्येक जातीला किती आरक्षण देणार आहेत ते त्या पक्षानं सांगावं असं आव्हान दिलं. काँग्रेस लोकांना खोटं बोलून फसवत आहे, सर्वांची दिशाभूल करत आहे असा आरोप त्यांनी केला.

गडकरी

मिरज विधानसभा मतदारसंघातील भाजपा उमेदवार सुरेश खाडे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल सभा घेतली. जलसंवर्धनामध्ये विदर्भात आणि महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या माध्यमातून अनेक कामं केली आहेत. धावणाऱ्या पाण्याला चालायला लावा, चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावा आणि थांबलेल्या पाण्याला जमिनीला प्यायला लावा. गावातलं पाणी गावात, घरातलं पाणी घरात आणि शेतातलं पाणी शेतात ही चळवळ खऱ्या अर्थानं राबविणं गरजेच असल्याचं गडकरी म्हणाले. महाराष्ट्रात 1000 अमृत सरोवर बांधल्याचा आनंद आहे. अनेक नदी, नाले खोलीकरण आणि रुंदीकरण केल्यामुळं पाणी साठवून क्षमता वाढली असंही गडकरी यांनी नमूद केलं.

फडणवीस दौरा

मुंबईतील झोपडपट्टी कोणत्याही मोठ्या व्यावसायिकांना दिलेली नसून धारावी पुनर्विकास प्रकल्पाद्वारे हे काम केलं जात आहे, त्यात सरकारची  भागीदारी असून सर्व प्रक्रिया परदर्शकपणे होत असल्याची स्पष्टोक्ती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल देसाईगंज इथं मध्यमांशी बोलताना दिली. भाजप महायुतीचे  उमेदवार कृष्णा गजबे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

मतदान जनजागृती

गेल्या चार निवडणुकांपासून एक व्यक्ती निवडणूक जाहीर होताच स्वतःहून मतदान जनजागृतीच्या विविध घोषवाक्यासह रंगवलेली छत्री, सायकलवर जागोजागी लावलेल्या घोषवाक्याच्या पाट्या, मतदान जनजागृतीच्या घोषवाक्याचा बॅनरसाठी वापरलेल्या साहित्याचा पोषाख अंगावर चढवून, हातात मेगाफोन घेवून सकाळी 6 वाजता जनजागृतीसाठी बाहेर पडते... कोणाकडून कोणताही मोबदला न घेता...हे आहेत जळगाव जिल्ह्याच्या एरंडोल तालुक्यातील कासोदा गावचे, मधुकर ठाकूर. त्याची ही बातमी....

मधुकर ठाकूर कार्यालयीन वेळेपर्यंत जवळपासचं कोणतं तरी गाव घेतात आणि मेगाफोन वरून जागृती करतात. गावच्या ग्रामपंचायतीत ते मानधनावर नोकरी करतात. कार्यालयीन वेळेत कार्यालयामध्ये हजर राहून कार्यालय संपताच पुन्हा संध्याकाळी उशीरापर्यंत जनजागृती हा यांचा नित्यक्रम. निवडणूक नसतानाही ते जळगाव जिल्ह्यातील विविध भागात वेगवेगळ्या शासकीय योजनांचा प्रचार प्रसार करतात. सध्या ते विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावागावात जाऊन मतदान जनजागृतीविषयी आवाहन करीत आहेत.  मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. ठाकूर यांच्यासारखे लोक स्वयंस्फूर्तीनं हे काम करतात हे कौतुकास्पद आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनीही मधुकर ठाकूर यांचा गौरव केला आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी जळगावहून राजेश यावलकर यांच्यासह, मनोज क्षीरसागर, पुणे.

मतदान-लग्न

वीस नोव्हेंबरला सर्वांनी मतदान करावं या आशयाचे संदेश लग्न सोहोळयापूर्वी वधु-वरांनी हातात घेऊन आवाहन करण्याचा सोहोळा काल पिंपरी-चिंचवड शहरात आयोजित करण्यात आला. यावेळी स्वीप मध्यवर्ती अधिकाऱ्यांनी मतदानाच्या शपथेचं वाचन केलं आणि उपस्थित नातेवाईक तसंच ३ हजारांहून अधिक पाहुण्यांनी मतदानाची शपथ घेतली. स्वीप मध्यवर्ती अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी मतदानाविषयी माहिती देऊन मतदान शपथेचं वाचन केलं तसंच सक्षम लोकशाहीसाठी मतदारांनी निवडणुकीमध्ये मतदान करणं आवश्यक असून त्याकरिता सर्वांनी मतदान करावं असं आवाहन केलं.

बेघर-मतदान

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याद्वारे संयुक्तपणे पिंपरी इथल्या सावली निवारा केंद्रामध्ये मतदान जनजागृतीचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी मतदानाचा निर्धार करण्यात आला. बेघर स्त्री पुरुष रहिवासी पिंपरीतील सावली निवारा केंद्रात 24 खोल्यांमध्ये सुमारे 2 ते 4 वर्षांपासून तात्पुरते वास्तव्य करतात. त्यांना मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी संस्थेचे अध्यक्ष हुसेन शेख आणि महापालिका प्रशासनानं लोकसभा निवडणूकीपूर्वी मतदानाची ओळखपत्र काढून दिली आहेत.

तन्वीर

प्रतिकूल परिस्थितीत नाटक करणे, प्रचलित व्यवस्थेवर टीका करणारं नाटक म्हणजे रंगभूमीवरील ‘ॲक्टिव्हिझम’ नव्हे तर त्याचा अर्थ याहून व्यापक आहे असं मत कर्नाटकातील नीळकंठेश्वर नाट्यसेवा संघाचे प्रमुख के. व्ही. अक्षरा यांनी व्यक्त केलं. पुण्याचं रुपवेध प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र कल्चरल सेंटर यांच्याद्वारे देण्यात येणाऱ्या ‘तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार कार्यक्रमात बीजभाषण करताना ते काल पुण्यात बोलत होते.

यावर्षी कर्नाटकातील यक्षगान कलाकार गणेश मंदार्थी आणि पश्चिम बंगालमधील ‘अमता परिचय’ या रंगभूमी समूहाच्या सह-संस्थापिका ऋतुपर्णा विश्वास यांना के. व्ही अक्षरा यांच्या हस्ते ‘तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. अक्षरा यांनी ‘रंगभूमीवरील सक्रियतेच्या कल्पनांचा विस्तार या विषयावर आपले विचार यावेळी व्यक्त केले.

पुरस्कार

महाराष्ट्र पोलीस दलात 35 वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय कामगिरी बजावून पोलीस संशोधन आणि विकास विभागाच्या महासंचालक पदावरून निवृत्त झालेल्या आयपीएस अधिकारी डॉक्टर मीरा बोरवणकर यांना यंदाचा अनंत भालेराव स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पन्नास हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या 8 डिसेंबरला सांभाजीनगर इथं त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार असल्याचं अनंत भालेराव प्रतिष्ठानचे संजीव कुलकर्णी आणि हेमंत मिरखेलकर यांनी सांगितलं.

हवामान

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. अन्यत्र हवामान सूर्यप्रकाशयुक्त राहील.